Original Article
ISSN (Online): 2582-7472

ShodhKosh: Journal of Visual and Performing Arts
July 2024 5(7SE), 202–207

# EFFORTS OF ELECTION COMMISSION OF INDIA TO PROTECT VOTING RIGHTS OF OVERSEAS INDIANS - A STUDY

# प्रवासी भारतीयांच्या मतदान अधिकार संरक्षणासाठी भारतीय निवडणूक आयोगाचे प्रयत्न - एक अध्ययन

Dr. Umesh Ashok Gogadia [1], Yogeshwar Subhash Patil [2]

[1] Department of Political Science and Public Administration, Kavayitri Bahinabai Chaudhary, North Maharashtra University, Jalgaon, India

https://crossmark.crossref.org/dialog/?doi=10.29121/shodhkosh.v5.i7se.2024.5884&domain=pdf&date_stamp=2024-07-31

**Corresponding Author**

Dr. Umesh Ashok Gogadia,
uagogadia@nmu.ac.in

**DOI**
**10.29121/shodhkosh.v5.i7SE.2024.5884**

**Funding:** This research received no specific grant from any funding agency in the public, commercial, or not-for-profit sectors.

**Copyright:** © 2024 The Author(s). This work is licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.

With the license CC-BY, authors retain the copyright, allowing anyone to download, reuse, re-print, modify, distribute, and/or copy their contribution. The work must be properly attributed to its author.

## ABSTRACT

**English:** Universal adult franchise, also known as general suffrage, grants the right to vote to all adult citizens (18 years and above) irrespective of caste, religion, colour, education and economic status. The adult franchise system is the bedrock of a democratic system. And it is based on the principle of equality. In the last few years, voter registration in India has increased significantly. However, the low voter turnout is a cause for concern. The 2019 general elections saw a 67.4% voter turnout. India has a relatively high voter turnout. However, on average, one in three voters did not vote in 2019. The Election Commission of India has identified over 300 million voters not exercising their franchise, as well as a large disparity in the turnout in the Lok Sabha and Assembly elections, which is a major challenge for the Election Commission. Apart from urban apathy (people not coming to cities to vote), adult apathy, intra-state migration, is another important reason for lack of participation in the electoral process. It is an important reason to pay attention to this. Work, education, marriage, etc. can lead to intra-state migration. According to the Election Commission, 85% of the migration is within the states. According to the 2011 census, 45.36 crore Indians (37%) of the population in India are migrants. This means that they have now become permanent residents in places other than their previous place of residence. However, 75% of such migration is due to marriage and family reasons. All these factors have an impact on the voting percentage of the Election Commission. The Election Commission is trying to find solutions to all these issues and increase the voter turnout. Accordingly, the present topic is worth researching.

**Hindi:** सार्वत्रिक प्रौढ मताधिकार, ज्याला सामान्य मताधिकार म्हणून देखील ओळखले जाते, सर्व प्रौढ नागरिकांना (१८ वर्षे आणि त्यावरील) जात, धर्म, रंग, शिक्षण आणि आर्थिक स्थिती विचारात नघेता मतदानाचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. प्रौढ मताधिकार प्रणाली ही लोकशाही व्यवस्थेचा पाया आहे. आणि ती समानतेच्या तत्त्वावर आधारित आहे. गेल्या काही वर्षांत भारतात मतदार नोंदणीत लक्षणीय वाढ झाली आहे. असे असले तरी मतदारांचा सहभाग कमी होणे हे चिंतेचे कारण आहे. २०१९ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत ६७.४% मतदान झाले होते. भारतात मतदारांचा सहभाग तुलनेने जास्त आहे. तरीही २०१९ मध्ये सरासरी तीनपैकी एक मतदार मतदान करीत नाही. भारतीय निवडणूक आयोग ३० कोटींहून अधिक मतदार त्यांच्या मताधिकारांचा वापर करत नसल्याच्याबद्दल तसेच विधानसभा व लोकसभेच्या मतदानात मोठ्या प्रमाणात तफावत आढते हे निवडणूक आयोगासमोरील एक मोठे आव्हान आहे. शहरी उदासीनता (लोक शहरांमध्ये मतदानासाठी येत नाही) या व्यतिरिक्त, प्रौढ उदासीनता, राज्यांतर्गत स्थलांतर, हे निवडणूक प्रक्रियेतील सहभागाचे एक महत्वाचे कारण आहे. याकडे लक्ष देणे एक महत्वाचे कारण आहे. काम, शिक्षण, लग्न, यामुळे राज्यांतर्गत स्थलांतर होऊ शकते. निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार एकंदरीत ८५% स्थलांतर हे राज्यांमध्ये आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील ४५.३६ कोटी भारतीय म्हणजे (३७%) लोक स्थलांतरित आहेत. म्हणजे आता त्यांच्यापूर्वीच्या निवास स्थानापेक्षा वेगवेगळ्या ठिकाणी स्थायीक झाले आहेत. तथापि अशा स्थलांतरीता पैकी ७५% स्थलांतर हे विवाह आणि कौटुंबिक कारणांमुळे होतात. या सर्व घटकांचा प्रभाव निवडणूक आयोगाच्या मतदानाच्या टक्केवारीवर होताना आपणास दिसून येतो. या सर्व बाबींवर उपाय

शोधण्यासाठी व मातदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी निवडणूक आयोग प्रयत्नशील आहे. त्यानुषंगणे प्रस्तुत विषय संशोधन करण्यास क्रमप्राप्त ठरतो.

## 1. प्रस्तावना

सार्वत्रिक प्रौढ मताधिकार, ज्याला सामान्य मताधिकार म्हणून देखील ओळखले जाते, सर्व प्रौढ नागरिकांना (१८ वर्षे आणि त्यावरील) जात, धर्म, रंग, शिक्षण आणि आर्थिक स्थिती विचारात नघेता मतदानाचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. प्रौढ मताधिकार प्रणाली ही लोकशाही व्यवस्थेचा पाया आहे. आणि ती समानतेच्या तत्त्वावर आधारित आहे. गेल्या काही वर्षांत भारतात मतदार नोंदणीत लक्षणीय वाढ झाली आहे. असे असले तरी मतदारांचा सहभाग कमी होणे हे चिंतेचे कारण आहे. २०१९ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत ६७.४% मतदान झाले होते. भारतात मतदारांचा सहभाग तुलनेने जास्त आहे. तरीही २०१९ मध्ये सरासरी तीनपैकी एक मतदार मतदान करीत नाही. भारतीय निवडणूक आयोग ३० कोटींहून अधिक मतदार त्यांच्या मताधिकारांचा वापर करत नसल्याच्याबद्दल तसेच विधानसभा व लोकसभेच्या मतदानात मोठ्या प्रमाणात तफावत आढते हे निवडणूक आयोगासमोरील एक मोठे आव्हान आहे. शहरी उदासीनता (लोक शहरांमध्ये मतदानासाठी येत नाही) या व्यतिरिक्त, प्रौढ उदासीनता, राज्यांतर्गत स्थलांतर, हे निवडणूक प्रक्रियेतील सहभागाचे एक महत्वाचे कारण आहे. याकडे लक्ष देणे एक महत्वाचे कारण आहे. काम, शिक्षण, लग्न, यामुळे राज्यांतर्गत स्थलांतर होऊ शकते. निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार एकंदरीत ८५% स्थलांतर हे राज्यांमध्ये आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील ४५.३६ कोटी भारतीय म्हणजे (३७%) लोक स्थलांतरित आहेत. म्हणजे आता त्यांच्यापूर्वीच्या निवास स्थानापेक्षा वेगवेगळ्या ठिकाणी स्थायीक झाले आहेत. तथापि अशा स्थलांतरीता पैकी ७५% स्थलांतर हे विवाह आणि कौटुंबिक कारणांमुळे होतात. या सर्व घटकांचा प्रभाव निवडणूक आयोगाच्या मतदानाच्या टक्केवारीवर होताना आपणास दिसून येतो. या सर्व बाबींवर उपाय शोधण्यासाठी व मातदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी निवडणूक आयोग प्रयत्नशील आहे. त्यानुषंगणे प्रस्तुत विषय संशोधन करण्यास क्रमप्राप्त ठरतो.

## 2. संशोधनाची उद्धीष्टे

1) निवडणूक आयोगाच्या RVM या नव्या प्रक्रियेचा अभ्यास करणे.
2) निवडणूक आयोगाच्या कार्यशैलीत होणाऱ्या बदलांचा अभ्यास करणे.
3) प्रगत तंत्रज्ञान आणि आधुनिक साधनाद्वारे अद्यायावत झालेल्या निवडणूक प्रणालीचा आढावा घेणे.
4) निवडणूक आयोगाच्या नवोदित उपक्रमांचा मतदान निर्णय प्रक्रियेवर होणारा परिणाम अभ्यासणे.

## 3. संशोधनाची गृहीतकृत्य

1) भारतीय निवडणूक आयोग नवउपक्रमांच्या माध्यमातून मतदानाची टक्केवारी वाढवित आहे.
2) निवडणूक प्रक्रियेतील दोष दूर करण्यासाठी निवडणूक आयोग संशोधन करून आपल्या कार्यशैलीत बदल करत असते.

## 4. संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन राज्यसशास्त्र विषयातील निवडणूक विश्लेषण शाखेशी आणि लोकप्रशासनाच्या संघटनात्मक दृष्टिकोण या विषय शाखेशी संबंधित असून हे संशोधन विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीने करण्यात आले आहे. हे संशोधन लोकप्रशासनाच्या संघटनात्मक सिद्धांताचे विस्तृत अध्ययन करण्याकरिता अत्यंत महत्वपूर्ण आहे तसेच प्रस्तुत संशोधनातून संघटनेच्या सिद्धांताचे पुनर्रपरीक्षण करण्यास मदत होते. प्रस्तुत संशोधनात प्राप्त दुय्यम माहितीच्या आधारे तथ्यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. त्याकरिता निवडणूक आयोगाची प्रकाशित सांख्यकीय माहिती, अहवाल वेळोवेळी निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळांवरून प्राप्त करण्यात आले आहे. तसेच वृतपत्र, शाकीय दस्तावेज या दुय्यम साधनांच्या आधारे माहिती मिळवून संशोधनात तथ्य संकलन करण्यात आले आहे.

प्राप्त तथ्यांचे वर्गीकरण करून पृथक माहितीचे तकत्त्यात रूपांतर करण्यात आले आहे. शेवटी महितीचे विश्लेषण केल्यानंतर अध्ययनाच्या निष्कर्षा पर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

# 5. विषय विवेचन

निवडणूक प्रक्रिया अधिक सर्वसमावेशक बनवण्यासाठी आणि देशांतर्गत स्थलांतराचा प्रश्न सोडवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने भारतीय निवडणूक आयोगाला डॉ. शमशिर वी. पी. विरुद्ध भारत सरकार या खटल्यात दिनांक २५/०६/२०१५ ला दिलेल्या आदेशात असे म्हटले आहे की भारतातील देशांतर्गत स्थलांतरीत मतदाराच्या मतदानाच्या अधिकाराचा प्रश्न सोडवण्यासाठी निवडणूक आयोगाने काही प्रयत्न करावेत. या धर्तीवर भारतीय निवडणूक आयोग ECI ने बहु-मतदार 'रिमोट इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन' (RVM) चा प्रस्ताव आणला आहे. इतर राज्यात काम करणारे लोक, स्थलांतरित मजूर, सैनिक, प्रवासी RVM चा वापर करू शकणार आहेत. याचा अर्थ ते घरी बसून मतदान करू शकतील असे होणार नाही. आयोगाच्या या सुविधेचा लाभ घेण्यासाठी मतदानाच्या दिवशी रिमोट व्होटिंग मतदानाच्या ठिकाणी पोहोचावे लागेल. याचा अर्थ घरून मतदान करा असा नाही. अंदाजानुसार, देशात ४५ कोटी लोक असे आहेत. जे आपली घरे आणि शहरे सोडून इतर राज्यात किंवा शहरात राहत आहेत. त्याचा केंद्रीकृत डेटा अस्तित्वात नाही. सार्वजनिक डोमेनमधील उपलब्ध डेटाचे विश्लेषण करून डेटा मिळविता येईल. काम, विवाह आणि शिक्षणाशी संबंधित स्थलांतर हे देशांतर्गत स्थलांतराचे महत्त्वाचे घटक मानतात. एकूणच देशांतर्गत स्थलांतरामध्ये ग्रामीण लोकसंख्येमध्ये बाहेरचे स्थलांतर प्रामुख्याने आहे. अंदाजे ८५% अंतर्गत स्थलांतर हे राज्यांमध्ये आहे. भारतातील बिहार या राज्यातील कामा निमित्तचे स्थलांतराचे प्रमाण सर्वात जास्त आहे. मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर लगेचच, श्री कुमार यांनी त्यांच्या चमोली जिल्ह्यातील दुमाक गावापर्यंतच्या त्यांच्या ट्रेकपासून घरगुती स्थलांतराच्या समस्या जाणून घेतल्याने, स्थलांतरित मतदारांना त्यांच्या सध्याच्या निवासस्थानावरून त्यांचा मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी त्यांचे लक्ष केंद्रित केले. अशा सक्षमीकरणासाठी अनेक कायदेशीर, वैधानिक, प्रशासकीय आणि तांत्रिक हस्तक्षेप आवश्यक असतील हे लक्षात घेऊन, ECI टीमने सर्व सामाजिक-आर्थिक स्तरांमधील स्थलांतरितांच्या निवडणूक सहभागासाठी सर्वसमावेशक उपाय शोधण्यासाठी विस्तृत विचार केला आहे. आणि द्वि-मार्गी भौतिक संक्रमणासारख्या पर्यायी मतदान पद्धतींचा शोध घेतला आहे. पोस्टल मतपत्रिका,फॅक्स मतदान, विशेष प्रारंभिक मतदान केंद्रांवर लवकर मतदान, पोस्टल मतपत्रिका (ETPBS), इंटरनेट-आधारित मतदान प्रणाली इ. पद्धतीने पडताळणी करून घेण्यात आली आहे.

सर्व भागधारकांना विश्वासार्ह, प्रवेशयोग्य आणि स्वीकारार्ह असा तांत्रिक उपाय शोधण्याच्या उद्देशाने, मुख्य निवडणूक आयुक्त श्री राजीव कुमार यांच्या नेतृत्वाखालील आयोगाने निवडणूक आयुक्त श्री. अनुपचंद्र पांडे आणि श्री. अरुण गोयल यांच्यासमवेत आता सुधारित पर्याय वापरण्याचा पर्याय शोधला आहे. स्थानिक स्थलांतरितांसाठी दूरस्थ मतदान केंद्रांवर म्हणजेच घरच्या मतदार संघाबाहेरील मतदान केंद्रांवर मतदान सक्षम करण्यासाठी M3 EVM मॉडेलची चाचणी घेण्यात आली आहे.  त्यामुळे स्थलांतरित मतदाराला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी त्यांच्या मूळ जिल्ह्यात परत जाण्याची आवश्यकता नाही.

देशांतर्गत स्थलांतरितांची व्याख्या, आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी, मतदानाची गोपनीयता सुनिश्चित करणे, मतदार ओळखण्यासाठी पोलिंग एजंटची सुविधा, दूरस्थ मतदानाची प्रक्रिया आणि पद्धत आणि मतांची मोजणी पूर्वी आव्हानांवर प्रकाश टाकणे खूप गरजेचे होते.

एका प्रसिद्ध सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमाच्या सहकार्याने आयोग आता एक Multi constituency Remote Electronics Voting Machine (RVM) प्रायोगिक तत्त्वावर चालवण्यास तयार आहे. जेणेकरून देशांतर्गत स्थलांतरितांना त्यांच्या दुर्गम ठिकाणांहून शिक्षण अथवा रोजगाराच्या उद्देशाने त्यांच्या सध्याच्या निवासस्थानी सहभागी होण्यास मदत होईल. त्यांच्या घरच्या मतदारसंघासाठी मतदान करण्यासाठी ईव्हीएमचा हा बदललेला फॉर्म एकाच रिमोट मतदान केंद्रावरून ७२ बहुविध मतदारसंघ हाताळू शकतो. या उपक्रमाची अंमलबजावणी केल्यास स्थलांतरितांचे सामाजिक परिवर्तन होऊ शकते. तसेच त्यांच्या मतदार संघाशी जोडले जाऊ शकतात. कारण वारंवार बदलणारी निवासस्थाने, पुरेसा सामाजिक आणि भावनिक संबंध नसणे यासारख्या विविध कारणांमुळे अनेक वेळा मतदार त्यांच्या कामाच्या ठिकाणी नावनोंदणी करण्यास इच्छुक नसतात. स्थलांतराच्या क्षेत्राच्या समस्यांसह, मतदारांचे नाव त्यांच्या मुळस्थान किंवा मूळ मतदारसंघाच्या मतदार यादीतून वगळण्याची इच्छा नसते कारण त्यांची ती कायमस्वरूपी भावनिक बांधिलकी असते.

आतापर्यंत झालेलेल्या ठराविक लोकसभेच्या मतदानाची वर्ष व टक्केवारी

| निवडणूक वर्ष | एकूण मतदार (कोटी ) | मतदानाची % |
|---|---|---|
| १९५१ | १७.३२ | ४५.६७ |
| १९५७ | १९.३७ | ५५.४२ |
| १९६२ | २१.६४ | ५५.४२ |
| २००९ | ७१.७० | ५८.२१ |
| २०१४ | ८३.४० | ६६.४४ |
| २०१९ | ९१.२० | ६७.४० |

स्रोत- भारतीय निवडणूक आयोगाच्या २८/१२/२०२२ च्या प्रसिद्धी पत्रक.

## 6. प्रवासी मतदार म्हणजे काय?

'काम, शिक्षण, व विवाह या कारणांमुळे ठराविक काळासाठी किंवा बऱ्याच कालावधीसाठी लोकांचे होणारे स्थलांतर म्हणजे प्रवासी मतदार होय'.

- निवडणुक आयोगाच्या प्रसिद्धी पत्रकावरू


## 7. RVM प्रणालीची विशेषता


1) RVM पूर्णता नेटवर्क विरहित प्रणाली आहे .
2) RVM प्रणालीचा उपयोग लहान क्षेत्रातील बहूनिर्वाचन क्षेत्रातील निवडणूक घेण्यासाठी निवडणूक केंद्रांसाठी करता येईल
3) RVM प्रणाली मुळे वेळ ,श्रम व निवडणूक आयोगाची आर्थिक बचत होईल .

## 7.1. RVM प्रणालीच्या वापरातील अडचणी

1) RVM प्रणाली लागू करणे निवडणूक आयोगासाठी खूप जिकरीचे काम आहे.
2) RVM प्रणाली वापरासाठी निवडणूक आयोगाला प्रशिक्षित कर्मचारी यंत्रणेची गरज आहे.
3) निर्वासित लोकांची आकडेवारी निवडणूक आयोगाकडे उपलब्ध नाही.

RVM मॉडेल: RVM ची वेगवेगळ्या राज्यातील मतदाराशी जोडणी दर्शविणारी आकृति




स्रोत- भारतीय निवडणूक आयोगाच्या २८/१२/२०२२ च्या प्रसिद्धी पत्रक.

## 7.3. RVM घटकांचे सविस्तर विश्लेषण

1) आरबीयू: रिमोट बैलेट युनिट मध्ये फिक्स केलेल्या बैलेट पेपर शीट च्या जागेवर गतिमान इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले (बियूओडि) बसविलेला असतो. मतदान क्षेत्राची सूची गतिमान पणे प्रदर्शित करण्याचे काम आरबीयू करत असते.
2) आरसीयू: रिमोट कंट्रोल युनिट मध्ये सीयू सारखा नियंत्रण (कंट्रोल) युनिट असतो. आरसीयू उमेदवार व निर्वाचन क्षेत्र वार उमेदवाराच्या मतांची संख्या जमा करण्यासाठी आरसीयू चा वापर केला जातो.
3) आरवीवीपीएटी: आरवीवीपीएटी मध्ये कार्यात्म एम 3 वीवीपीएटी प्रमाणे कार्य करत असतो. यात उमेदवाराची चिन्ह फोटो वेगवेगळे विधान सभा क्षेत्र व लोकसभा क्षेत्र यांच्या मताची आकडेवारी जमा करण्याचे काम आरवीवीपीएटी करत असतो .
4) आरएसएलयू: रिमोट सिंबल लोडिंग युनिटचा उपयोग होम आरओ च्या नियंत्रणाने लैपटॉप च्या माध्यमातून विधानसभा क्षेत्र व लोकसभा क्षेत्र उमेदवाराच्या चिन्हाचे आणि प्रतिकाचे जतन करण्याचे आणि तीच प्रतीके रिमोट आरओ च्या नियंत्रणातून आरवीवीपीएटी लोड करण्याचे काम केले जाते.
5) सीसीआर: मतदान क्षेत्र कार्ड रीडर (सीसीआर ) एक बारकोड रीडर आहे यात एक पेक्षा अधिक मतदान क्षेत्रातील येणाऱ्या मतदान केंद्रा वर येणाऱ्या मतदाता संख्याचे वाचन करण्याचे कार्य सीसीआर करत असते. हे पीडीसीयू युनिटला जोडलेले असते.
6) पीडीसीयू: पब्लिक डिस्प्ले कंट्रोल युनिट सीसीआर, पब्लिक डिस्प्ले व आरबीयू यांच्या मध्ये इंटरफेस च्या रूपात कार्य करण्याचे कार्य करत असते. जेव्हा सीसीआर च्या माध्यमातून मतदाता कार्ड वाचले जाते त्यानंतर मतदाताच्या मतदान क्षेत्र व मतदान केंद्राची सूची पब्लिक डिस्प्ले व आरबीयू या दोन ठिकाणी प्रदर्शित होते. यासाठी पीडीसीयू चा उपयोग होतो.

## 7.4. RVM प्रणाली अंमलात आणल्यास अपेक्षित परिणाम

### 7.4.1. निवडणूक आयोगाच्या दृष्टिकोनातून भविष्यातील निवडणुकांसाठी ही पद्धत उपयुक्त

भारता सारख्या लोकशाही प्रधान देशात भारतातील मतदाराच्या मतदान अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी तसेच निवडणूक प्रक्रियेत मतदाराची मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी व लोकशाही प्रक्रिया सक्षम करण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगात नव्याने येणाऱ्या RVM प्रणाली ही काम, शिक्षण, व विवाह या कारणांमुळे ठराविक काळासाठी किंवा बऱ्याच कालावधीसाठी आपल्या मूळ स्थानांपासून किंवा गावापासून दूर राहणाऱ्या लोकाना मतदानाचा अधिकार मिळऊन देण्यासाठी ही पद्धत उपयुक्त ठरणार आहे. एक उत्तम अशी व्यवस्था भारतीय निवडणूक आयोगाच्या दृष्टीने भविष्यातील निवडणुकांसाठी उपयुक्त अशी प्रणाली ठरणार आहे.

### 7.4.2. निवडणूक प्रक्रियेतील बरेच दोष दूर होण्यास ही पद्धत उपयुक्त

निवडणूक प्रक्रिया अधिक सर्वसमावेशक बनवण्यासाठी आणि देशांतर्गत स्थलांतराचा प्रश्न सोडवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने भारतीय निवडणूक आयोगाला डॉ.शमशिर वी. पी. विरुद्ध भारत सरकार या खटल्यात दिनांक २५/०६/२०१५ ला दिलेल्या आदेशात असे म्हटले आहे की भारतातील देशांतर्गत स्थलांतरीत मतदाराच्या मतदानाच्या अधिकाराचा प्रश्न सोडवण्यासाठी निवडणूक आयोगाने काही प्रयत्न करावेत.२०१९ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत ६७.४% मतदान झाले होते. भारतात मतदारांचा सहभाग तुलनेने जास्त आहे. तरीही २०१९ मध्ये सरासरी तीनपैकी एक मतदार मतदान करीत नाही. भारतीय निवडणूक आयोग ३० कोटींहून अधिक मतदार त्यांच्या मताधिकारांचा वापर करत नसल्याच्याबद्दल तसेच विधानसभा व लोकसभेच्या मतदानात मोठ्या प्रमाणात तफावत आढते हे निवडणूक आयोगासमोरील एक मोठे आव्हान आहे. या निवडणूक आयोगाच्या प्रक्रियेतील दोष दूर करण्यासाठी व भारतातील स्थलांतरितांच्या मतदान अधिकाराचे संरक्षण करण्यासाठी व निवडणूक प्रक्रिया सर्व समावेशक करण्यासाठी RVM प्रणाली उपयुक्त ठरणार आहे.

## 8. अध्ययनाचे निष्कर्ष

1) मतदानाची टक्केवारी वाढविण्यास ही पद्धत उपयुक्त ठरते मात्र या पद्धतीची प्रायोगिक चाचणी झालेली नसल्याने संभाव्य अडचणी देखील येणे अपेक्षित आहे.
2) लोकांच्या मतदानाच्या अधिकाराचे संरक्षण करण्यासाठी प्रस्तुत पद्धत उपयुक्त ठरू शकते असे निदर्शनास येते.
3) मतदान प्रक्रिया सर्वसमावेशक होण्यासाठी RVM प्रणालीमुळे मदत होईल व निवडणूक प्रक्रियेत वेळ श्रम आणि पैसाचा अपव्यय कमी होईल.

## 9. सूचना

1) निवडणूक आयोगाने नव्या प्रणालीचा वापर करत असताना लोकांच्या मनात निवडणूक आयोगा विषयी असलेली विश्वासहार्यता टिकऊन ठेवण्यासाठी प्रयत्न करावेत.
2) मतदाराच्या मतदान अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी निवडणूक आयोगाने काही नव्या संकल्पना अंमलात आणल्या पाहिजे यात काही शंका नाही.

## सन्दर्भ

भारतीय निवडणूक आयोगाचे सं.५१/८/१६/आरवीएम/२०२१ ईडीपी एस. दिनांक २८/१२/२०२२ चे प्रसिद्धी पत्रक.
महेंद्र पाटील , निवडणूक व्यवस्थापन , प्रशांत पब्लिकेशन्स जळगांव , नोव्हेंबर २०१९
निवडणूक वार्ता " राज्य निवडणूक आयोग " , महाराष्ट्र . जुलै २०१६ अंक दूसरा
निवडणूक वार्ता "राज्य निवडणूक आयोग", महाराष्ट्र . जानेवारी २०१८ वर्ष तिसरे ,अंक पहिला
आगलावे प्रदीप " समाजिक संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे .
eci.gov.in/ebooks/eci-atlas/index